| | |
|---|---|
| MHBU100011762023 | दाखल दिनांक - ०९/०८/२०२३ |
| | नोंदणी दिनांक - ०९/०८/२०२३ |
| | निकाल दिनांक - ११/०३/२०२६ |
| | कालावधी - वर्षे महिना दिवस<br>०२ ०७ ०२ |
| | निशाणी क्रमांक - ०९ खाली |

| | |
|---|---|
| **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१) मलकापूर, जिल्हा बुलढाणा यांचे न्यायालयात** | |
| ( पिठासीन अधिकारी : पी.एस.ठाकरे ) | |
| निकाल तारीख : ११.०३.२०२६ | |
| **संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६४२/२०२३** | |
| अपराध क्र.५७/२०२३ महाराष्ट्र दारु बंदी कायदा ६५ (ई). | |
| **अभियोग पक्ष :-** | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत मलकापुर शहर पोलीस ठाणे,<br>मलकापूर, जिल्हा बुलडाणा. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ:- | सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती. आर.बी.देवराज |
| **-विरुध्द-** | |
| **आरोपी :-** | मोहन रामेश्वर संभारे,<br>वय - २३ वर्षे, व्यवसाय - मजुरी<br>रा.बेलाड, ता.मलकापुर, जिल्हा बुलडाणा. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ:- | विधीज्ञ श्री.आर.एम.निकम. |

# न्यायनिर्णय

( दिनांक ११ मार्च २०२६ रोजी पारीत )

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अन्वये खटला चालविण्यात आला.

०२. आरोपीवर नि.क्र.०९ खाली दोषारोप ठेवुन त्याला तो वाचुन दाखविण्यात आला. त्याने दोषारोप कबुल केला नाही व खटला चालवण्याची विनंती केली.

०३. अभियोगपक्षातर्फे पंच अ .सा.क्र.१ गणेश विष्णु दहिभाते यांची साक्ष नोंदविण्यात आली.

०४. आरोपी विरुद्ध कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर न आल्याने त्याचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे नोंदवण्यात आला नाही.

०५. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०६. अभियोगपक्षातर्फे मांडलेली हकीकत, समोर आलेला पुरावा लक्षात घेता प्रस्तुत खटल्याचे न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह त्यापुढे दर्शविल्याप्रमाणे नोंदविलेले आहे. ते खालील प्रमाणे,

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ३०/०७/२०२३ रोजी १४.३० वाजेच्या सुमारास ग्राम | |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | बेलाड, ता.मलकापुर, जिल्हा बुलडाणा येथे आरोपी हा विदेशी दारुच्या १० बॉटल व देशी दारू संत्रा २७ प्लास्टीकच्या बॉटल असा मुद्देमाल बाळगून त्याची अवैध रित्या विक्री करत असल्याचे व त्या अन्वये महाराष्ट्र दारु बंदी कायदयाच्या कलम ६५ (अ) व (ई) नुसार गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष शाबित करतो काय? | नकारार्थी |
| २. | अंतिम आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

०७. **मुद्दा क्र. १ बाबत -**

अभियोगपक्षातर्फे पंच साक्षीदार क्र.१ गणेश दहिभाते याच्या साक्षीनुसार तो आरोपीला ओळखत नसुन घटनेसंदर्भात पोलीसांनी त्याला कुठेही पंचनाम्यासाठी बोलावले नसल्याचे कथन केले असून, दि.३०.०७.२०२३ रोजीच्या पंचनाम्यावर अनुक्रमांक १ वर त्याची पंच म्हणून सही असून त्यातील मजकुराबाबत त्याला माहीत नसल्याचे सांगुन, त्यावेळेस दुसरा पंच कोण होता हे माहीत नसल्याचे सांगितले. तसेच पोलीसांनी त्याच्यासमोर काहीही जप्त केले नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करीत नसल्याने सरकारी वकिलांनी त्याला न्यायालयाची परवानगी घेवुन उत्तर सुचक प्रश्न विचारले असता, कोणताही प्रत्यक्षदर्शी पुरावा अभिलेखावर आला नाही. त्यामुळे त्याचा पुरावा अभियोगपक्षाकरीता उपयुक्त नाही. अशा परिस्थीतीत पंचनामा हा सिध्द झाला नाही.

१०. याशिवाय अभियोगपक्षाला पुरेशी संधी देवूनही अभियोगपक्षाने अभिलेखावर रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल केलेला नाही. त्यामुळे अशा परिस्थीतीत तपासीधिका-यांनी सदर गुन्हयातील जप्त केलेला मुद्देमाल / द्रव्य हे दारूच होते याबाबत

साशंकता निर्माण होते. त्यामुळे एकूणच घटनेवर व तपासावर संशय निर्माण होतो. त्यामुळे अशा परिस्थीतीत आरोपीने तथाकथीत घटनेच्यावेळी त्याच्याजवळ विदेशी दारूच्या प्रत्येकी १८० मि.ली.च्या १० बाटल्या किंमत रुपये १६००/- व देशी दारुच्या प्रत्येकी ९० मि.ली.च्या २७ प्लास्टीक बाटल्या मिळून आल्या त्याची किंमत ९४५/-, दोन प्लास्टीक ग्लास व एक प्लास्टीक मग सध्याची किंमत १००/- रुपये असा एकूण २६४५/- रुपयांचा मुद्देमाल बाळगला, हे सिध्द होत नाही.

११. सबब, पुराव्या अभावी आरोपी हा निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. जप्त मुद्देमाल हा दारुच्या बाटल्या असल्यामुळे त्या राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, बुलडाणा यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. तसेच एक प्लास्टीक मग मुल्यहीन असल्या कारणाने नाश करणे योग्य होईल. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा उपलब्ध नसल्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी मोहन रामेश्वर संभारे याला फौ.प्र.सं.च्या कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(अ) व (ई) खालील आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीने दिलेले बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ प्रमाणे रुपये ५,०००/- चा जामीन द्यावा. |
| ४. | जप्त मुद्देमाल हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५२ प्रमाणे अपील कालावधी संपुष्टात आल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, बुलडाणा यांचेकडे पाठवावा व एक प्लास्टीक मग हा मुल्यहीन असल्या कारणाने नष्ट करण्यात यावा. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.03.12 17:32:03 +0530

( पी.एस.ठाकरे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मलकापुर

दिनांक- ११.०३.२०२६

**CERTIFICATE**

| | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order is same, word to word, as per the original Judgment/Order. | |
| Name of the Stenographer | A.B. Shinde |
| Court | J.M.F.C. Court No.1, Malkapur |
| Date | 11/03/2026 |
| Judgment signed by the presiding officer on | 11/03/2026 |
| Judgment uploaded on | 12/03/2026 |